**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक**
**पुणे महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक – १४/१२/२०२२

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.१०**
**डिसेंबर २०२२**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **मंगळवार,दि.२०/१२/२०२२** रोजी **दुपारी ४.०० (चार)** वाजता **महापालिका आयुक्त कार्यालयात** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.२५६**

**संदर्भ–** १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८३,दि.२१/१२/२०२१
३) मनपा ठराव क्र.८१५,दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२४,दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१६९,दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२१७,दि.१/११/२०२२

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम –२०१४ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीची अर्हता व नेमणुकांच्या पध्दती | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी –२ | उप अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन –२५% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक | पदोन्नती –१००% स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्याआस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावर कार्यरत असणे आवश्यक |
| | | | पदोन्नती –७५% | स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्या आस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | |

( टीप :– पुणे महानगरपालिकेकडील शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील सेवकांची पदोन्नतीची कुंठीता घालविण्यासाठी वरीलप्रमाणे पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१४ मध्ये बदल करणे आवश्यक आहे.)

( टीप – सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २०२२ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.२६८, दि.१/१२/२०२२ चा झाला आहे. )

**विषय क्र.२५७**

**संदर्भ–** १) मा.स्थायी समिती ठ.क्र. ९३६, दि. ०५/०१/२०२१.
२) मा. तांत्रिक छाननी समिती ठ.क्र. १५९, दि. २३/९/२०२२.
३) मुख्य अभियंता पथ कार्यालयाकडील जा.क्र. पथ/४८२५, दि. १९/९/२०२२.
४) मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/८२६, दि. ७/११/२०२२ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्र.१०६८,दि.२२/११/२०२२

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पुल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत महंमदवाडी स.नं. २६,२७,३७ मधील २४ मी डी.पी. रस्ता व कल्व्हर्ट बांधणे व महंमदवाडी स.नं. ३८,४०,४१,५५,५६ मधील ३० मी. डी. पी. रस्ता विकसित करणे या कामासाठी निविदा प्रसिद्ध करणे व पोस्ट टेंडर ॲक्टिवीटी करिता तज्ञ सल्लागार नेमणूक करणेचे अंदाजित खर्च र.रू. २६,३०,९०,०९४/– हाती घेणेस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२५८**

**संदर्भ–** १)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/७४८,दि.१३.१०.२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०३,दि.९/११/२०२२.
३) स्थायी समिती ठराव क्र.१०९७,दि.२२/११/२०२२

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे पेठ शिवाजीनगर येथील स.नं.१००/१०१, कुसाळकर पुतळ्यासमोरील व्यावसायिक इमारती मधील गाळा क्र.३ (अंध अपंग (दिव्यांग) व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेला आहे) ही मिळकत ३ वर्षे कालावधीकरीता भाडेतत्वावर देणेबाबत निविदेतील क्र. १ चे निविदाधारक श्री.अथर्व राजू पवार पत्ता–ब्लॉक नं.३९, वडार हौ.सोसा.,शिवाजीनगर, पुणे–४११०१६ यांनी देऊ केलेली मासिक र.रू. ९००९/–(अक्षरी र.रू.नऊ हजार नऊ फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक र.रू. ८,९७४/–(अक्षरी र.रू. आठ हजार नऊशे चौऱ्याहत्तर फक्त) पेक्षा र.रू. ३५/– (अक्षरी र.रू. पस्तीस फक्त) ने जास्त आहे. त्याप्रमाणे सदर मिळकत लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु व सेवाकर प्रचलित दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार श्री.अथर्व राजू पवार यांचे सोबत लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२५९**

**संदर्भ–** १)बांधकाम विकास विभाग झोन ७ यांचेकडील जा.क्र.७/२८७१,दि.०६/१२/२०२१.
२)मा.महापालिका आयुक्त यांचेकडील दि.०६/०४/२०२२ रोजी झालेली बैठक.
३)महामेट्रोकडील जा.क्र.४२९,दि.२९/०९/२०२२ रोजीचे पत्र.
४)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/७४९,दि.१३.१०.२०२२चे पत्र.
५) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०४, दि. ९/११/२०२२.
६) स्थायी समिती ठराव क्र.१०९८,दि.२२/११/२०२२

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे मेट्रो रेल प्रकल्पाने बाधित कुटुंबाचे पुनर्वसन करणेकरीता सदाशिव पेठ सि.स.नं.७८९ झाशीची राणी शाळेची जागा खालील बाबींचे अवलोकन करून उपलब्ध करून देणेबाबत करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१)सदर झाशीची राणी शाळेची सुमारे १२३४.८५ चौ.मी. जागेचा ताबा प्रिमियम रक्कम रू.६,६२,९९,०९७/– इतकी महामेट्रोकडून आकारून ३० वर्षे कालावधीकरीता पुणे मनपाच्या स्वामित्वापोटी दरवर्षी र.रू.१/– या दराने महामेट्रोस हस्तांतरीत करणेस व करारनामा करणेस.

२)सदर जागेवरील आरक्षण बदल अथवा जागेचा वापर बदल करण्याची कार्यवाही ही मेट्रोमार्फत करणेस.

३)झाशीची राणी शाळेच्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या निवासी इमारतीमध्ये पुणे मनपाच्या कार्यालयासाठी पूर्वीच्या क्षेत्राएवढी सुमारे ४५७.२५९ चौ.मी. इतकी बांधिव जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

४)सदर भाडेकरार पुणे मनपा मिळकतवाटप नियमावली सन २००८ मधील तरतूदींना अधीन राहून पुढील कालावधीकरीता नुतनीकरणास पात्र राहील.

**विषय क्र.२६०**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/७७४,दि.१९.१०.२०२२ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०५, दि. ९/११/२०२२.
३) स्थायी समिती ठराव क्र.१०९९,दि.२२/११/२०२२

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन–

पुणे पेठ सदाशिव स.नं.७२१/२अ, फा.प्लॉ.नं.९८७ अ, इंदुलाल कॉम्पलेक्स येथील तिसऱ्या मजल्यावरील गाळा क्र. ३१४ (क्षेत्रफळ २६४ चौ.मी.) अव्यावसायिक दराने ५ वर्षे कालावधीसाठी वज्र प्रतिष्ठाना या संस्थेस देणेस खालील बाबींचे अवलोकन करून मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१)मा.महापालिका सभेच्या मान्यता दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी मिळकतवाटप नियमावली २००८ मधील भाग १२(२६)प्रमाणे विद्युत निरीक्षक,विद्युत विभाग,पुणे यांना मासिक भाडे र.रू.४९,८८८/–प्रमाणे देणेस.(दर ३वर्षांनी १२% भाडेवाढ करणे.)

२)विद्युत निरीक्षक, विद्युत विभाग, पुणे समवेत करारनामा करणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी मिळणेस.

**विषय क्र.२६१**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/७७६,दि.१९.१०.२०२२ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०६, दि. ९/११/२०२२.
३) स्थायी समिती ठराव क्र.११००,दि.२२/११/२०२२

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड हा केंद्र शासनाचा अंगीकृत उपक्रम असल्याने सदर गाळ्याच्या मुदतवाढीकरिता मिळकतवाटप नियमावलीतील २००८ मधील भाग १२(२६) नुसार निविदा मागविण्याची आवश्यकता नाही. तरी पुणे पेठ स्वा.सावरकर उद्योग भवन येथील दुसऱ्या मजल्यावरील ओ–२–सी हा गाळा युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांना दिलेल्या गाळ्याच्या मुदतवाढीबाबत खालील बाबींचे अवलोकन करून मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१)दि.०१.०४.२००५ पासून मा.महापालिका सभेच्या मान्यता दिनांकापर्यंतचा कालावधी नियमान्वित करणेस.

२)मा.महापालिका सभेच्या मान्यता दिनांकापासून ०३ वर्षे कालावधीसाठी मिळकतवाटप नियमावली २००८ मधील भाग १२(२६) प्रमाणे युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांना मासिक भाडे र.रू.८३,४५७/–(दर ३ वर्षांनी १२% वाढ करून) अधिक शासकीय कर घेणेस त्यानुसार मुदतवाढ देणेस.

३)युनाइटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांच्या समवेत करारनामा करणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी मिळणेस

**विषय क्र.२६२**

**संदर्भ–** १)पी.एम.सी.कॉलनी राजेवाडी, नाना पेठ येथील नागरिकांचे भवनरचना कार्यालयाकडील आ.क्र. ४७०८ , दि.५/१०/२०२१ चे पत्र.
२)केबीपी सिव्हील इंजिनियरिंग सर्विसेस यांचा स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट.
३)मा.तांत्रिक छाननी समिती ठ.क्र.११५,दि.०१/०८/२०२२.
४)भवन रचना विभागाकडील जा.क्र.४०३४,दि.१७/१०/२०२२ चे पत्र.
५)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/८०६,दि.३१.१०.२०२२ चे पत्र.
६) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.११६, दि. ९/११/२०२२.
७) स्थायी समिती ठराव क्र.११०१,दि.२२/११/२०२२

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पीएमसी कॉलनी राजेवाडी, नाना पेठ येथील इमारतींचे बांधकाम पाडणेबाबत खालील बाबींना मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

- पीएमसी कॉलनी राजेवाडी, नाना पेठ येथील इमारती धोकादायक झाल्यामुळे सदर धोकादायक इमारतींचे मोडकळीस आलेले संपूर्ण बांधकाम मालमत्ता निर्लेखित (write off ) करणेस.

**<u>विषय क्र.२६३</u>**

**संदर्भ–** १)अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेकडील दि. १९/१०/२०२२ रोजीचे पत्र.

२) मा.महापालिका आयुक्त यांचेजा.क्र.मआ/माव्य/८१६,दि.०१.११.२०२२ चे पत्र.

३) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.११८, दि. ९/११/२०२२.

४) स्थायी समिती ठराव क्र.११०२,दि.२२/११/२०२२

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ बावधन स.नं.२०/३/७+३/८ येथील सुविधा बंगला निवास स्थानासाठी अध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन लि. यांना देणेबाबत खालील अटींवर सदर बंगल्याची जागा कराराने देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१)सदरच्या बंगल्याची मुदत ही सध्याचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे नेमणूक कालावधीपर्यंत राहील.

२)सदर बंगला व लगतचा मोकळ्या परिसराची देखभाल दुरूस्ती, सुरक्षा व इतर आवश्यक सर्व खर्च हा पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी करावयाचा आहे.

३)सदर बंगल्याच्या भाड्यापोटी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक या पदास लागू असणाऱ्या घरभत्या एवढी रक्कम पुणे मनपाकडे भरावी लागेल.

४)सदर बंगल्याची पुणे मनपास आवश्यकता भासल्यास ३ महिने आगोदर नोटीस देण्यात येईल. सदर नोटीस मिळाल्यानंतर तो आहे त्या स्थितीत रिकामा करून देणेची जबाबदारी ही पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांची राहील.

**<u>विषय क्र.२६४</u>**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अतिक्रमण/८५२,दि.१५/११/२०२२ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.११०४,दि.२२/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या नगर पथविक्रेता समिती २०२२ निवडणूक बिले खर्ची टाकणेसाठी र.रू.२८ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका, बजेटकोड नं.RE25B119, (पथारी व्यावसायिकांकरिता पथारी प्रकल्प तयार करून अंमलबजावणी करणे.) | र.रू. २८ लक्ष | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम –</u> अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका, नगरपथ विक्रेता समिती २०२२ निवडणूक बिले खर्ची टाकणे. | --- | र.रू. २८ लक्ष |

( मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर सदर ठरावाची कार्यवाही करण्यात यावी.)

**<u>विषय क्र.२६५</u>**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/८६०,दि.२१/११/२०२२ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.१११७,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.२५ ड संविधान चौकामध्ये राष्ट्रध्वज उभा करणेसाठी फाऊंडेशनची कामे करणे साठी र.रू. २५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, भवन विभाग, पुणे महानगरपालिका, बजेट कोड नं. CE17A242/SJ6-93,भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, | र.रू. २५ लक्ष | --- |

| | | |
|---|---|---|
| नवीन सुचविलेले काम –<br>उपआयुक्त परिमंडळ क्र.४ , प्रभाग क्र. २५ ड संविधान चौकामध्ये राष्ट्रध्वज उभा करणेसाठी फाऊडेशनची कामे करणे. | --- | र.रू. २५ लक्ष |

**विषय क्र.२६६**

**संदर्भ–** १) चांदणी चौक पुणे येथे सतत होणाऱ्या वाहतूक कोंडी प्रकरणी दि. २८ ऑगस्ट २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या समक्ष जागा पहाणी मधील आदेश.

२)मा.( DGM Tech.) प्रोजेक्ट डायरेक्टर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पुणे यांचेकडील जा.क्र. ३१४३, दि. २७/०८/२०२२ चे पत्र.

३) मा.( DGM Tech.) प्रोजेक्ट डायरेक्टर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पुणे यांचेकडील आवक/जावक.क्र. ३१४८, दि. २९/०८/२०२२ चे पत्र.

४) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. ६/४४३, दि.०६/०९/२०२२ अन्वये मान्यता.

५) मे. एस ॲण्ड जे बिल्डकॉन प्रा.लि. यांना जा.क्र. ८८१, दि.०६/०९/२०२२ अन्वयेचा कार्यादेश.

६) मा. तांत्रिक छाननी समिती यांचा ठराव क्र.१५६ दि.०८/०९/२०२२ अन्वये मान्यता.

७) मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/८६१, दि. २१/११/२०२२ चे पत्र.

८) स्थायी समिती ठराव क्र.१११८,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरातील चांदणी चौक येथील नियोजित पुलाचे बांधकामात अडथळा ठरणाऱ्या पाणी व विद्युत सेवावाहिन्या, राष्ट्रीय महामार्गाचे पातळीचे वरून स्थलांतरीत करण्याचे काम तातडीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७(३)(क) अंतर्गत करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात यावी.

१. पुणे पेठ बावधन येथील चांदणी चौकातील जल व विद्युत वाहिन्यांचे स्थलांतर करणे करिता आवश्यक संरचना तयार करणे व जल व विद्युत वाहिन्यांचे स्थलांतर करणे ही कामे तातडीने करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६७ (३)(क) अन्वये मे. एस ॲण्ड जे बिल्डकॉन प्रा.लि. यांचेकडून सदर कामे चालु दरपत्रकानुसार अंदाजित रक्कम रू.र.२,६४,३४,०००=९१ अधिक ( टेस्टिंग + रॉयल्टी + जी.एस.टी. चार्जेस पोटी र.रू. ५०,०९,९४४=१७ ) र.रू. ३,१४,४३,९४६/– इतका पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत करून घेणेस.
२. सदर पर्यायी व्यवस्था ही तात्पुरत्या स्वरूपाची असल्यामुळे NHAI मार्फत नव्याने पूल उभारणी झाल्यानंतर त्यालगत असलेल्या सेवावाहिन्या मार्गिकेमधून कायमस्वरूपी जल व विद्युत वाहिन्या स्थलांतरीत झाल्यानंतर आताचा तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात येणारा Mid Steel संरचना तदनुषंगिक कामे काढून घेणेकरिता स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविणेस.
३. उपरोक्त प्रस्तावातील प्रत्यक्ष होणाऱ्या कामांच्या मोजमापानुसार ( मटेरिअसल टेस्टिंग चार्जेस + रॉयल्टी + GST) सह होणारे देयक मे. एस ॲण्ड जे बिल्डकॉन प्रा.लि. यांना अदा करणेस.
४. मे. उपरोक्त कामांचे देयक, पाणीपुरवठा खात्याकडील ZE1616C103 / PR3-1 व विद्युत विभागाकडील CE20B102/ST2-158 या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस
५. उपरोक्त कामे पूर्ण झाले नंतर प्रत्यक्ष झालेल्या कामांच्या खर्चाबाबतचे निवदेन मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर .

**विषय क्र.२६७**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/८६५,दि.२१/११/२०२२ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.११२०,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे पेठ पर्वती स.नं. १२१,१२२ येथील फेज–३ मधील कलाग्रामचे कामाकरिता अतिरिक्त र.रू. ४८,१८,०५५/– इतकी रक्कम टप्प्याटप्प्याने पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि यांचेकडे वर्ग करणेचे अधिकार मा. महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांना देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२६८**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/८६६, दि.२१/११/२०२२ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.११२१,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. १० ब वात्सल्यपुरम, कोथरूड सर्वे नंबर ५२/३४+३९+४२+४१ अ येथील ॲमेनिटी स्पेसवर विरंगुळा केंद्राचे उर्वरित काम करणेसाठी र.रू. १०० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प कार्यालय)पुणे महानगरपालिका, नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबविणे (PPP/कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/ सुधारणा करणे) (CE20D219/L2-11) | १०० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेले काम –<br>भवनविभाग,पुणे महानगरपालिका, प्रभाग क्र. १० ब वात्सल्यपुरम, कोथरूड सर्वे नंबर ५२/३४+३९+४२+४१ अ येथील ॲमेनिटी स्पेसवर विरंगुळा केंद्राचे काम करणे | --- | १०० लक्ष |

**विषय क्र.२६९**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८७१,दि.२२/११/२०२२ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.११२३,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरातील प्राथमिक घनकचरा संकलन व वाहतूक करणे करिता वाहने भाडेतत्वावर घेणेकामी मोटार वाहन विभागामार्फत मागविण्यात आलेली निविदा क्र.०८/२०२२ Selection ofcontractor(s)for provision and operation of Primary transportation vehicles (small belltruck ( min 2.5 MT GVW) Refuse Collector ( min 10 MT GVW) , Compactor ( min 18.5 MT GVW) for Municipal Solid Waste ( MSW) for a period of seven years for zone 5 कामी मे. अमृत एन्टरप्रायझेस, ठाणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने ( पुगप रक्कमेपेक्षा (+) ३ % जादा दराने) रक्कम रू. ६५,६५,८७,६८९=४१ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत एकूण सात वर्ष कालावधी करिता करणेकामी निविदा कालावधी सात वर्षाचा असल्यामुळे चालू आर्थिक वर्ष संपल्यानंतर र.रू. ६२,५५,५४,५८३=३७ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत होणाऱ्या खर्चाचे दायित्व पत्करावे लागणार असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील ब नुसार सन २०२२–२३ हे आर्थिक वर्ष संपल्यावर देखील खर्च होणार असल्याने अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापूर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेणे कामी महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ ब नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२७०**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८७३,दि.२२/११/२०२२ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.११२४,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरातील प्राथमिक घनकचरा संकलन व वाहतूक करणे करिता वाहने भाडेतत्वावर घेणेकामी मोटार वाहन विभागामार्फत मागविण्यात आलेली निविदा क्र.०६/२०२२ Selection ofcontractor(s)for provision and operation of Primary transportation vehicles (small belltruck ( min 2.5 MT GVW) Refuse Collector ( min 10 MT GVW), Compactor ( min 18.5 MT GVW) for Municipal Solid Waste ( MSW) for a period of seven years for zone 2 कामी मे. अमृत एन्टरप्रायझेस, ठाणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने ( पुगप रक्कमेपेक्षा (–) ०.००२ % कमी दराने) रक्कम. रू. ६४,५७,२४,७८४=३१ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्यावी लागणारी अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत निविदा कालावधी सात वर्षाचा असल्यामुळे चालू आर्थिक वर्ष संपल्यानंतर र.रू. ६१,५७,८०,९३२=२८

अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत होणाऱ्या खर्चाचे दायित्व पत्करावे लागणार असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील ब नुसार सन २०२२–२३ हे आर्थिक वर्ष संपल्यावर देखील खर्च होणार असल्याने अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापूर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेणे कामी महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ ब नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२७१**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मोवावि/८७५, दि.२२/११/२०२२ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.११२५,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरातील प्राथमिक घनकचरा संकलन व वाहतूक करणे करिता वाहने भाडेतत्वावर घेणेकामी मोटार वाहन विभागामार्फत मागविण्यात आलेली निविदा क्र.०५/२०२२ Selection ofcontractor(s)for provision and operation of Primary transportation vehicles (small belltruck ( min 2.5 MT GVW) Refuse Collector ( min 10 MT GVW), Compactor ( min 18.5 MT GVW) for Municipal Solid Waste ( MSW) for a period of seven years for zone 1 कामी मे. सुमित फॅसिलिटी लिमिटेड, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने ( पुगप रक्कमेपेक्षा (+) ०.७० % जादा दराने) रक्कम रू. ६५,६२,३१,२५९=१२ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रकमेपर्यंत एकूण सात वर्ष कालावधीकरिता करणेकामी निविदा कालावधी सात वर्षाचा असल्यामुळे चालू आर्थिक वर्ष संपल्यानंतर र.रू. ६२,५७,९४,९४८=४८ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत होणाऱ्या खर्चाचे दायित्व पत्करावे लागणार असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील ब नुसार सन २०२२–२३ हे आर्थिक वर्ष संपल्यावर देखील खर्च होणार असल्याने अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापूर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेणे कामी महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ ब नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२७२**

**संदर्भ–** १) सन २०२२–२३ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकातील तरतुदीस मा. मुख्य लेखा व वित्त विभाग यांचे जा.क्र. ५७८, दि. १८/०५/२०२२ नुसार वित्तीय समितीची मान्यता.
२) मा. उपआयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र. ५७८५,दि. १६/०३/२०२२ रोजीचे कंत्राटी सेवक संख्येचे पत्र.
३)मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ ३/८८१, दि.२३/११/२०२२ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र.११२८,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मा. उपआयुक्त परिमंडळ क्र.३ कार्यालय अंतर्गत वारजे कर्वेनगर या क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत पडीक हद्दींची दैनंदिन स्वच्छता करणेकामी महापालिका अधिनियम ६७ (३)(क) अन्वये ठेकेदारांची नेमणूक करणे कामी वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आऊट सोर्सिंग पद्धतीने हद्दीतील झाडणकाम माहे ऑक्टोबर २०२२ पासून ते नविन निविदेचे कार्यादेश होईपर्यंतच्या कालावधीसाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) अन्वये मे. सिद्धीविनयाक एंटरप्रायजेस यांचेकडून मा. उप कामगार अधिकारी विभागामार्फत वेळोवेळी निश्चित करण्यात येणाऱ्या दरास पर्यवेक्षकीय शुल्क आकारून मान्य दरास अॅटपार दराने करून घेणेस व करारनामा करणेस सदरची बाब मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

**विषय क्र.२७३**

**संदर्भ–** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मोवावि/८८०,दि.२३/११/२०२२ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.११३१,दि.२३/११/२०२२

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरातील प्राथमिक घनकचरा संकलन व वाहतूक करणे करिता वाहने भाडेतत्वावर घेणेकामी मोटार वाहन

विभागामार्फत मागविण्यात आलेली निविदा क्र.०८/२०२२ Selection ofcontractor(s)for provision and operation of Primary transportation vehicles (small belltruck ( min 2.5 MT GVW) Refuse Collector ( min 10 MT GVW), Compactor ( min 18.5 MT GVW) for Municipal Solid Waste ( MSW) for a period of seven years for zone 4 कामी मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने ( पुगप रक्कमेपेक्षा (–) ०.९९ % कमी दराने) रक्कम रू. ६४,४३,४०,३८१=५४ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रकमेपर्यंत एकूण सात वर्ष कालावधीकरिता करणेकामी निविदा कालावधी सात वर्षाचा असल्यामुळे चालू आर्थिक वर्ष संपल्यानंतर र.रू. ६१,३७,१२,८७५=६६ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत होणाऱ्या खर्चाचे दायित्व पत्करावे लागणार असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील ब नुसार सन २०२२–२३ हे आर्थिक वर्ष संपल्यावर देखील खर्च होणार असल्याने अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापूर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेणे कामी महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ ब नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२७४**

**संदर्भ–** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मोवावि/८८३,दि.२३/११/२०२२ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.११३३,दि.२३/११/२०२२

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहरातील प्राथमिक घनकचरा संकलन व वाहतूक करणे करिता वाहने भाडेतत्वावर घेणेकामी मोटार वाहन विभागामार्फत मागविण्यात आलेली निविदा क्र.०७/२०२२ Selection ofcontractor(s)for provision and operation of Primary transportation vehicles (small belltruck ( min 2.5 MT GVW) Refuse Collector ( min 10 MT GVW), Compactor ( min 18.5 MT GVW) for Municipal Solid Waste ( MSW) for a period of seven years for zone 3 कामी मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने ( पुगप रक्कमेपेक्षा (–) ०.९९ % कमी दराने) रक्कम रू. ६४,२९,८३,१३२=०२ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रकमेपर्यंत एकूण सात वर्ष कालावधीकरिता करणेकामी निविदा कालावधी सात वर्षाचा असल्यामुळे चालू आर्थिक वर्ष संपल्यानंतर र.रू. ६१,३३,१५,५५९=०४ अधिक निविदेतील महागाई दरवाढ सुत्राप्रमाणे द्याव्या लागणाऱ्या अतिरिक्त रक्कमेपर्यंत व अधिक या कामाकरिता जीएसटी लागू झाल्यास होणाऱ्या रक्कमेपर्यंत होणाऱ्या खर्चाचे दायित्व पत्करावे लागणार असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील ब नुसार सन २०२२–२३ हे आर्थिक वर्ष संपल्यावर देखील खर्च होणार असल्याने अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापूर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेणे कामी महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ ब नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र.२७५**

**संदर्भ–** १) मा.अति.महा.आयुक्त (ई) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९०७,दि.२३/११/२०२२ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र.११८६,दि.८/१२/२०२२

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडील ११– यांत्रिकी, क– यांत्रिकी स्थापत्य अधिकारी यांचे कार्यालय या अंदाजपत्रकीय शिर्षकावरील २– पेट्रोल,डिझेल, ऑईल व सिएनजीसाठी खर्च व १७ – RTO विषयक कामे करणेसाठी र.रू. १३ कोटी ९८ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी प्राथमिक वाहतुकीसाठी गाड्या आऊटसोर्सिंग तत्वावर (मनपा/ठेकेदाराकडील ) चालविणे ( व्हे. डेपो) (RE19A149) | र.रू. १३ कोटी ९८ लाख | --- |

| | | |
|---|---|---|
| नवीन सुचविलेले काम –<br>मोटार वाहन विभाग<br>पेट्रोल,डिझेल, ऑईल व सिएनजीसाठी खर्च RE21A103 | --- | र.रू.<br>१३ कोटी३३लाख |
| १७ – RTO विषयक कामेकरणे.RE21C117 | --- | र.रू. ६५ लाख |

**मा.शहर सुधारणा समितीचे ठराव**

**विषय क्र.२७६**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टिडीआर/८५१,दि.१५.११.२०२२ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.११९,दि.८/१२/२०२२

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे सप्टेंबर २०२२ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे,म.कर्वेनगर येथील स.नं.१३/१/१(पैकी) सि.टी.एस.नं.५०० (पैकी) | ३० मी. व ३६ मी. डि.पी. रस्ता | समीरदेवराम दुधाने | विरळवस्ती | ५०२.०० चौ.मी. | १११.५१ चौ.मी X २.०५= २२८.६० चौ.मी. | ००५९८२ | सप्टेंबर २०२२ |

**विषय क्र.२७७**

**संदर्भ–** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र./८५८,दि.२१.११.२०२२ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२१,दि.८/१२/२०२२

----

पुणे महानगरपालिका प्रशासानाकडील अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग-१ (वेतनश्रेणी-एस २३ : ६७७००-२०८७०० + मान्य भत्ते) या संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या पदोन्नतीने भरणेसाठी मा.पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या सेवकांची तसेच शासनाकडील वेळोवेळीचे प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून खालील सेवकांची तात्पुरत्या पदोन्नतीने नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**तक्ता क्र.१ – निवड यादी**

| अ.क्र. | नाव | प्रत्यक्ष जातीचा ग☐ | तात्पुरती पदोन्नतीचा ग☐ | शैक्षणिक पात्रता | उप अभियंता या पदावरील नेमणूकदिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.भांगरे शिरीष मधुसूदन | अज | खुला | डी.सी.ई. | ०४/०९/२००० |
| २ | श्री.भांगे प्रसाद लुमाजी | अज | खुला | डी.सी.ई. | ०४/०९/२००० |
| ३ | श्री.गांगुर्डे काशिनाथ चिंतामणी | अज | खुला | डी.सी.ई. | ०२/०३/२००१ |

**तक्ता क्र.२- प्रतीक्षा यादी**

| अ.क्र. | नाव | प्रत्यक्ष जातीचा ग☐ | तात्पुरती पदोन्नतीचा ग☐ | शैक्षणिक पात्रता | उप अभियंता या पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.कुलकर्णी संजय भानुदास | खुला | खुला | डी.सी.ई. | १०/१०/२००२ |
| २ | श्री.अहिरे सुनिल रामदास | अज | खुला | डी.सी.ई. | २७/०७/२००७ |

**विषय क्र.२७८**

**संदर्भ–** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शहर अभियंता/९२३,दि.३०.११.२०२२ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२४,दि.८/१२/२०२२

----

पुणे पेठ लोहगाव स.नं.२०७ येथील महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले आरक्षण नंबर **WO-**1,**PSTN-7** व

**MSEDCL-3** या आरक्षणाचे क्षेत्र कायम ठेऊन त्याच ठिकाणी मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबाताच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे आकारामध्ये किरकोळ स्वरूपाचे बदलाचे फेरनियोजन करून **UDCPR** चे विनियम क्र.३.११ नुसार प्रस्तावित आरक्षणाच्या आकारामध्ये आहे त्याच ठिकाणी स्थलांतरित करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र**

**विषय क्र.२७९**

प्रभाग क्र.४७( जुना ४१) कोंढवा बुद्रुक येथील कात्रज–कोंढवा ८४.० मीटर रूंद रस्ता व आर.एम.डी. शाळेसमोरील २४.० मी.रूंद डी.पी.रस्ता येथील जागेत राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा ब्राँझ धातूचा १३.० फुट उंच पूर्णाकृती अश्वारूढ पुतळा उभारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ भवन / ९४१ , दि.५/१२/२०२२ चे पत्र.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**